**म.वि.प्र.समाजाचे**

**कर्मवीर शांतारामबापू कोंडाजी वावरे कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय उत्तमनगर सिडको नाशिक**

# राष्ट्रीय सेवा योजना २०१८-२०१९

## विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर अहवाल

## दि.२२/१२/२०१८

विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर अहवाल पहिल्या दिवशी सकाळ सत्रात उदघाटन करून शिबिराची सुरुवात करण्यात आली. उद्घाटन कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून नानासाहेब महाले संचालक म.वि.प्र.समाज नाशिक प्रमुख अतिथी म्हणून प्रल्हाद (नाना) गडाख संचालक म.वि.प्र.समाज, गावाचे सरपंच दत्तू भाऊ ढगे, कार्यक्रमाचे प्रास्ताविक सिडको महविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.जे.डी.सोनखासकर यांनी केले तर सात दिवसातील उपक्रम आणि उद्देश्याविषयी माहिती सातपूर महाविद्यालायचे प्राचार्य डॉ.डी.जी.उशीर यांनी सांगितले विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.कामासाई एस.व्ही.एम. यांनी आपले मनोगत व्यक्त केले.





गावाच्या सरपंचानी गावाचा इतिहास सांगत,गावाची भौगोलिक माहिती सांगितली.व गावातील कामाचा आढावा घेत आपले मनोगत मांडले. नाना साहेब महाले यांनी आपले अध्यक्षीय भाषण करत सर्वांना मार्गदर्शन केले. सातपूर महाविद्यालयाचे कार्यक्रम अधिकारी प्रा.एम.डी.शेंडगे सरांनी सर्वांचे आभार मानत कार्यक्रमाची सांगता केली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कार्यक्रम अधिकारी प्रा. रविराज वटणे, प्रा. श्रीमती एस. एस. गांगुर्डे , प्रा.श्रीमती वर्षा शिरोरे, प्रा.निवृत्ती राठोड, प्रा. के. एस. तिडके प्रा.श्रीमती मांडे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. के.एम.खालकर, डॉ सुंभे सर , प्रा.चव्हाण सर यांनी प्रयत्न केले.

दुपारच्या सत्रात व्याख्याते म्हणून विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कामासाई एस.व्ही.एम. यांनी कायदेविषयक साक्षरता या विषयावर व्याख्यान देत उपस्थित सर्वांना सखोल असे मार्गदर्शन केले.

## दि: २३/१२/२०१८

शिबिराच्या दुसऱ्या दिवशी सकाळी नियमित पद्धतीने प्रार्थना घेण्यात आली त्या विद्यापीठ गीत, रा.से.यो. गीत,इतर प्रार्थना घेण्यात आल्या. गावचे सरपंच दत्तूभाऊ ढगे यांच्या मार्गदर्शनाखाली श्रमदान करण्यासाठी स्वयंसेवकांची विभागणी करत एक गट गावाजवळील आनंदवनात घेऊन जाण्यात आला तर दुसरा गट गावातील प्राथमिक शाळाच्या परिसरात स्वच्छता करण्यात आली .आनंदवनात

गेलेल्या स्वयसेवकांनी तेथे लावण्यात आलेल्या ७,००० झाडांच्या निगा राखण्याचे काम सुरु करण्यात आले. त्या झाडांना आळे करणे, पाणी घालणे, इत्यादी कामे केली, या सत्रात २२०० झाडांना आळे करण्यात आले. तर दुसरा गट गाव हद्दीतील मातोश्री नगर परिसरात घेऊन जाऊन स्वच्छता मोहीम राबवत तेथील रस्ते, नाले इत्यादी स्वच्छता करण्यात आली. सिडको महाविद्यालयाच्या इतिहास विभागाच्या वतीने बेलगाव ढगा गावचे इतिहास लेखन करण्यात आले





दुपारच्या सत्रात प्रमुख वक्ते म्हणून आलेल्या नाशिक मनपाच्या मा.नगरसेविका डॉ.अश्विनी बोरस्ते यांनी जमलेल्या समस्त गावकरी भगिनी व उपस्थितांना बचतगटाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. तसेच या सिडको महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. जे.डी.सोनखासकर यांनी जमलेल्या समस्त गावकरी भगिनी व उपस्थितांना मार्गदर्शन केले.





# दि.२४/१२/२०१८

शिबिरातील तिसऱ्या दिवशी नियमित प्रमाणे प्रार्थना घेऊन श्रमादानाला सुरुवात करण्यात आली. एक गट आनंदवनात जाऊन त्या झाडांची निगा राखण्याचे काम चालू ठेवण्यात आले. या दिवशी २२०० झाडांचे निगा राखण्याचे काम स्वयंसेवकाकडून करण्यात आले. सिडको महाविद्यालयाच्या मानसशास्त्र विभागाच्या वतीने यांनी गावातील ग्रामस्थांच्या मानसिक आरोग्य चाचण्या येऊन गावातील लोकांच्या मानसिक आरोग्याचा आढावा घेतला तसेच सिडको महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागाच्या

वतीने गावचा राजकीय दृष्टीकोनातून अभ्यास करण्यात आला. गावातील ग्रामस्थांना व स्वयंसेवकांना मतदान प्रक्रियेत वापरली जाणारी नवीन VVPAT मशीन विषयी माहिती देऊन त्याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आली.






दुपारच्या सत्रात व्याख्याते म्हणून आलेल्या सिडको महाविद्यालयाच्या मानसशास्त्र विभाग प्रमुख डॉ.शुभांगी गोसावी यांनी व्याख्याते म्हणून जबाबदारी पार पाडत उपस्थितांना **'तरुण तरुणीचे मानसिक आरोग्य'** या विषयावर मार्गदर्शक केले.

# दि.२५/१२/२०१८

शिबिरातील तिसऱ्या दिवशी नियमित प्रमाणे प्रार्थना घेऊन श्रमादानाला सुरुवात करण्यात आली. एक गट आनंदवनात जाऊन त्या झाडांची निगा राखण्याचे काम चालू ठेवण्यात आले. आजच्या दिवशी उर्वरित २६०० झाडांना आळे करणे, पाणी घालणे इत्यादी निगा राखण्याचे काम संपन्न करण्यात आले. तर दुसरा गट गाव हद्दीतील राजवाडा परिसरात घेऊन जाऊन स्वच्छता मोहीम राबवत तेथील रस्ते,नाले, इत्यादी स्वच्छ करण्यात आले. सिडको महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभागाच्या वतीने गावातील लोकांच्या कुटुंबांचे आर्थिक सर्वेक्षण करण्यात आले.






दुपारच्या सत्रात व्याख्याते म्हणून लाभलेल्या सिडको महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ.साधना पाटील यांनी उपस्थितांना **'राष्ट्रीय उत्पन्न लेखांकन'** या विषयावर मार्गदर्शक केले. तसेच या सत्राच्या शेवटी रा.से.यो. विभाग प्रमुख डॉ. गोरक्षनाथ पिंगळे सरांनी शिबिरास भेट देऊन स्वयंसेवकांशी संवाद साधला व उपस्थित सर्वांना मार्गदर्शन केले.

# दि. २६/१२/२०१८

शिबिरातील पाचव्या दिवशी नियमित प्रमाणे प्रार्थना घेऊन श्रमादानाला सुरुवात करण्यात आली. सर्व स्वयंसेवका समवेत गावाजवळील संतोषी डोंगरावर जाऊन तेथे असणारी जैवविविधता, बंधारे, CCT, डोंगरतळे, इत्यादी दाखविण्यात आली तसेच तेथे डोंगराच्या पायथ्याला ५० वृक्षाचे रोपण करण्यात आले, स्वयंसेवकांनी खड्डे खाणून त्यात वृक्षारोपण करून तेथील जैवविविधता वाढविण्यास हातभार लावला. याच दिवशी म.वि.प्र.समाज संस्थेचे वसंतराव पवार मेडीकॅल कॉलेज च्या वतीने गावातील ग्रामस्थांसाठी मोफत आरोग्य व नेत्र तपासणी शिबीर ठेवण्यात आले होते. त्याच बरोबरीने सिडको महाविद्यालयाच्या सूक्ष्मजीवशास्त्र विभागाच्या वतीने मोफत हिमोग्लोबिन तपासणी शिबिरचे ही आयोजन करण्यात आले होते. त्याचा लाभ ग्रामस्थांनी घेतला







दुपारच्या सत्रात व्याख्याते म्हणून प्रसिध्द समाजसेविका डॉ. वैशाली बालाजीवाले यांनी **'सामाजिक जबाबदारी'** या विषयावर उत्तम असे व्याख्यान देऊन उपस्थिताना मार्गदर्शन केले.

# दि. २७/१२/२०१८

शिबिरातील सहाव्या दिवशी नियमित प्रमाणे प्रार्थना घेऊन श्रमादानाला सुरुवात करण्यात आली. गाव हद्दीतील शेवटचा वार्ड ६ वा मैल येथे जाऊन रस्ते, नाले, मंदिर परिसर इत्यादी स्वच्छता करण्यात आली तसेच स्वयंसेवकांनी तेथील ग्रामस्थांसाठी पथनाट्य सादर करण्यात आली. सिडको महाविद्यालयाच्या रसायनशास्त्र विभागाच्या वतीने मोफत माती-पाणी परीक्षण शिबिरचे ही आयोजन करण्यात आले होते. त्याचा लाभ ग्रामस्थांनी घेतला त्यात २० मातीचे व १५ पाण्याचे नमुन्याचे परीक्षण करण्यात आले व संबधित ग्रामस्थांना माती-पाणी परीक्षणाचे करून निष्कर्ष देण्यात आले.






दुपारच्या सत्रात व्याख्याते म्हणून सिडको महाविद्यालयाच्या गणित विभागाचे प्रमुख आणि रा.से.यो. मध्ये १७ वर्ष कार्यक्रम अधिकारी म्हणून काम केलेले प्रा.एस.टी.घुले यांनी रा.से.यो. मध्ये काम करत असताना आलेले अनुभव, आलेल्या अडचणी उत्तमरीत्या उदाहरणासह स्पष्ट करून सांगितले. खूप सुंदर आणि प्रभावी या व्याख्यानामुळे स्वयंसेवकामध्ये रा.से.यो. बदल अधिक चांगल्या प्रेरणादायी भावना निर्माण होण्यास मदत झाली. या विषयावर उत्तम असे व्याख्यान देऊन उपस्थिताना मार्गदर्शन केले.

## २८/१२/२०१८

विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराच्या शेवटच्या दिवशी नियमित प्रमाणे प्रार्थना झाल्यानंतर समर्थ भारत अभियानाची सुरुवात करण्यात आली अभियानांतर्गत गाव हद्दीतील परिसरामध्ये रॅली काढण्यात आली. त्या वेगवेगळ्या घोषणा देत स्वयंसेवकांनी विविध सामाजिक विषयावर जनजागृती करण्याचा प्रयत्न केला तसेच गावहद्दीतील मातोश्री नगर व राजवाडा परिसरात सिडको महाविद्यालयाच्या वतीने पथनाट्य, सातपूर महाविद्यालयाच्या वतीने देशभक्तीपर मुकनाट्य सदर करण्यात आले तर विधी महाविद्यालयाच्या वतीने विविध सामजिक विषयावरील भारुड सदर करण्यात आले.






दुपारच्या सत्रात शिबिराचा समारोप संपन्न झाला त्या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून नानासाहेब महाले संचालक म.वि.प्र.समाज नाशिक, प्रमुख अतिथी म्हणून सचिन पिंगळे साहेब संचालक म.वि.प्र.समाज नाशिक, तिन्ही महाविद्यालयाचे प्राचार्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा. एस.टी.घुले यांनी तर प्रास्ताविक प्राचार्या आदरणीय डॉ.जे.डी.सोनखासकार यांनी केले स्वयंसेवकामधून प्रत्येक महाविद्यालयाच्या एकाने आपले अनुभव व्यक्त केले.प्रमुख पाहुण्यांनी आपले मार्गदर्शन केल्यानंतर ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या वतीने ग्रामसेवक रवींद्र पवार यांनी आपले मनोगत व्यक्त केले व शिबिरात झालेल्या कामाचा लेखाजोखा मांडला. अध्यक्षीय भाषणात नानासाहेब

महाले यांनी सर्वाना मार्गदर्शन केले. कार्यक्रम अधिकारी प्रा. रविराज वटणे यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रम संपन्न केला.






कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कार्यक्रम अधिकारी प्रा.एम.डी.शेंडगे, प्रा. श्रीमती एस. एस. गांगुर्डे , प्रा.श्रीमती वर्षा शिरोरे, प्रा.निवृत्ती राठोड, प्रा. के. एस. तिडके प्रा.श्रीमती मांडे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. के.एम.खालकर, डॉ सुंभे सर , प्रा.चव्हाण सर यांनी प्रयत्न केले. सातदिवशीय विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर उत्तमरीत्या व यशस्वीपणे पूर्ण केले.

**कार्यक्रम अधिकारी रा.से.यो.**
**(प्रा.रविराज वटणे)**

**प्राचार्या**
**(डॉ. जे.डी.सोनखासकर)**